**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**

**महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या**

(A Government of Maharashtra Undertaking)

( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

---

# सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या विकास कामांचा घेतला आढावा

मुंबई १२: राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी आज महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाला अर्थात दादासाहेब फाळके चित्रनगरीला भेट देऊन विविध विकास कामांचा आढावा घेतला.

यावेळी व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. दरम्यान श्री. खारगे यांनी चित्रनगरीत सुरु असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. विशेषत: त्यांनी नूतनीकरण करण्यात येत असलेले कलागरे, बाह्यचित्रीकरणस्थळे, तसेच विविध मालिकांचे उभारण्यात आलेल्या सेटलाही भेट दिली.

त्यानंतर महामंडळातील विविध विभागांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. धनंजय सावळकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, उप अभियंता ( स्थापत्य) विजय बापट, उप अभियंता ( विद्युत) अनंत पाटील, व्यवस्थापक ( कलागरे) संतोष खामकर, विशेष कार्यकारी अधिकारी संजय पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी अनिल माने, राजीव राठोड, मुकेश भारद्वाज, मोहन शर्मा, अनिता कांबळे, मंगेश राऊळ आदि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

---

जनसंपर्क विभाग.

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव